...alai Nagar East, Madurai – 62...

**PEARL**

A FOUNDATION FOR
EDUCATIONAL EXCELLENCE

## ...ational Excellence Awa...
## ...gher Education in India 201...

*Best Senior Women Sc... Award*
*in Zoology*

**Dr. Suvarna Balakrishna More**

Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya,
Kavathe Mahankal, Maharashtra

जनप्रवास

# सुवर्णा मोरे यांना उत्कृष्ट शास्त्रज्ञ पुरस्कार

## पीव्हीपी महाविद्यालयाच्या लौकिकात भर




कवठेमहांकाळ : डॉ. सुवर्णा मोरे यांना पुरस्कार प्रदान करताना न्यायाधीश जी. आर. स्वामीनाथन, कुलगुरु डॉ. एम. लक्ष्मण आदी मान्यवर.

. नागज / वार्ताहर

कवठेमहांकाळ येथील पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयातील जीवशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका डॉ. सुवर्णा मोरे यांना उत्कृष्ट शास्त्रज्ञ पुरस्कार मिळाला आहे. तमिळनाडूमधील मदुराई येथे नुकत्याच झालेल्या सायन्स, मेडिसिन, अॅग्रीकल्चरल रिसर्च व टेक्नॉलॉजीच्या राष्ट्रीय परिषदेत मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायाधीश जी. आर. स्वामीनाथन यांच्याहस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कामराज विद्यापीठ व पर्ल फौंडेशन, मदुराई यांच्याकडून भारतातून उच्च शिक्षण व संशोधन करणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार देण्यात येतो. कवठेमहांकाळ येथील पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. सुवर्णा मोरे यांनी आजवर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध पुरस्कार आणि पारितोषिके मिळविली आहेत. पर्ल फौंडेशनच्या पुरस्कारामुळे मोरे व पीव्हीपी महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली गेली आहे.

पुरस्कार वितरण सोहळ्यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम. लक्ष्मण, सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. सीलनाप्प, तामिळनाडू कृषी विद्यापीठाचे डीन जी व्हल्ली, प्रो. तीरुमल (माजी कुलगुरू), प्रो पार्थशास्त्री अध्यक्ष नॅशनल अकॅडमी, तामिळनाडू आदी उपस्थित होते.

दरम्यान, पुरस्काराबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक बाबर यांच्यासह शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष साहेबराव पवार (दाजी), सचिव बाळासाहेब शिंदे (तात्या) व सहकारी प्राध्यापक मंडळींनी सुवर्णा मोरे यांचे अभिनंदन केले आहे.

जनप्रवास -16 Dec- 2017




चेन्नई : येथे डॉ. सुवर्णा मोरे (कवठेमहांकाळ) यांना बेस्ट सायंटिस्ट अॅवॉर्ड प्रदान करण्यात आला.

# डॉ. सुवर्णा मोरे यांना बेस्ट सायंटिस्ट अॅवॉर्ड

सांगली, ता. १ : कवठेमहांकाळ येथील वसंतदादा महाविद्यालयातील डॉ. सुवर्णा मोरे यांना तामीळनाडू मदूराई येथे १० डिसेंबर रोजी झालेल्या सायन्स, मेडिसिन, अॅग्रीकल्चर रिसर्च व टेक्नॉलॉजी 'राष्ट्रीय' परिषदेत डॉ. सुवर्णा बाळकृष्ण मोरे यांना उत्कृष्ट ज्येष्ठ शास्त्रज्ञ पुरस्कार मिळाला. मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायाधीश जी. आर. स्वामीनाथन यांच्या हस्ते मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. भारतात उच्चशिक्षण व संशोधन करणाऱ्या व्यक्तींना कामाराजा विद्यापीठ (मदुराई) आणि पर्ल फौंडेशन (मदुराई) यांच्या वतीने पुरस्कार देण्यात येतो. डॉ. एम. लक्ष्मण (कुलगुरू, मदुराई विद्यापीठ) प्रमुख पाहुणे होते. पद्मविभूषण डॉ. नामपेरूमलसम(तामीळनाडू), सीव्हनाप्पा (तामीळनाडू, कृषी विद्यापीठ), जी. व्हल्ली रवीचंद्रन (मदर तेरेसा विद्यापीठ, तामीळनाडू), तीरूमलाई (तामीळनाडू विद्यापीठ), पार्थशास्त्री (नॅशनल अॅकॅडमी, चेन्नई).

सकाळ 2 Jan-18